# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-१

## प्रसिध्दीपत्रक

विषय :- वाणिज्य टंकलेखन परीक्षा डिसेंबर २०१६- जानेवारी २०१७ साठी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर भरणेबाबत..

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१६/४५७८,दि.१८/७/२०१६.

२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११६/एसडी-२,दि. १३ जुलै, २०१६

सर्व शासनमान्य टंकलेखन संस्थांना कळविण्यात येते की, वाणिज्य टंकलेखन परीक्षा डिसेंबर २०१६ - जानेवारी २०१७ साठी आपल्या संस्थेत प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती www.mscepune.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

दि. २१ सप्टेंबर ते ०७ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत ही link सुरु राहील. चालु सत्रासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन भरण्यात यावी. ऑनलाईन माहिती नोंद केलेल्या विद्यार्थ्यांचीच आवेदनपत्रे भरता येतील, आवेदनपत्रे भरण्यासाठी परिषदेच्या संकेतस्थळावर यथावकाश लिंक (Link) देण्यात येईल. याची संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

महत्त्वाच्या सूचना :-

१) संस्थांनी login द्वारे मान्यता आदेश /नुतनीकरण आदेशाची प्रत upload करावी.

२) उपरोक्त संदर्भिय शासन शुध्दीपत्रकानुसार यापुढे मॅन्युअल टायपिंग अभ्यासक्रमास मुदतवाढ मागणार नाही, याबाबतचे लेखी प्रतिज्ञापत्र संस्थाचालक/प्राचार्य यांनी स्वाक्षरी व शिक्क्यासह स्कॅन करुन अपलोड करावे.प्रतिज्ञापत्राचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(प्रतिज्ञापत्र स्टँपपेपरवर करण्याची आवश्यकता नाही.)

३) उपरोक्त दोन्ही कागदपत्रे स्कॅन करुन(स्वतंत्रपणे) upload करावीत. प्रत्येकाची साईज 250 KB पेक्षा कमी असावी.

४) मान्यता/नुतनीकरण आदेश, प्रतिज्ञापत्र अपलोड केल्यानंतर व टंकलेखन विद्यार्थी क्षमता नोंदविल्यानंतरच विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज login द्वारे उपलब्ध होतील.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-०१

दिनांक : २०/०९/२०१६.

स्थळ : पुणे.

E:\s\New letter\ALL GCC EXAM FILES\PRASIDHIPATRAK.docx